**"जानेवारी २०१८" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ३ जानेवारी २०१८ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४ अंतर्गत कक्ष अधिकारी गट-ब संवर्गातील १७ परिविक्षाधीन उमेदवारांचे टप्पा क्रमांक-५ मधील खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण दिनांक ९ जानेवारी ते ८ जून २०१८ या कालावधीत घेण्यात येणार आहे.

- दिनांक ५ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेमधील "कार्यालयीन अधिक्षक / स्टेनाग्राफर वर्ग-३" या पदाची श्रेणी अवनत करुन, त्या पदावर श्री.रा.ना.जगताप, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांची प्रतिनियुक्ती नियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

- दिनांक ५ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालय मुख्य इमारतीतील मंत्रालय उपाहारगृहातील व नवीन प्रशासन भवन येथील उपाहारागृहात महानगर गॅस लिमिटेडव्दारे बसविलेल्या गॅस मीटरपासून उपाहारगृहामधील स्वयंपाकगृहातील शेगडयांपर्यंत गॅस पुरवठा करण्यासाठी लागणारी पाईपलाईन व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी रु.९२.०० लाख इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक १ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना प्रवासभत्ता व विमान प्रवास संदर्भातील विविध सवलती लागू केल्या आहेत.
- दिनांक १० जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील १९५ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १५ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये श्री.राधेश्याम मोपलवार, भाप्रसे यांच्याविरुद्ध प्राप्त तक्रारींबाबत चौकशी करण्यासाठी त्रिस्तरीय समितीचे अध्यक्ष यांना दिनांक २८ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०१७ या कालावधीसाठी रु.४.८० लाख इतके एकत्रित मानधन निश्चित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक २० जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये बिगर राज्य नागरी सेवेतून (NON-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशींसाठी पात्रता निकष (Bench Mark Critaria) विहित करण्यात आले आहे.

- दिनांक २३ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट असलेली ५९ पदे व आकृतीबंधात नसलेली ४६ पदे अशा १०५ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

- दिनांक २५ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या ८ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल**

- भारतीय प्रशासन सेवेतील २१ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- उपसचिव व कक्ष अधिकारी संवर्गातील प्रत्येकी एका अधिकाऱ्याची बदली करण्यात आली आहे.
- उपसचिव व अवर सचिव संवर्गातील अनुक्रमे २, १ अशा ३ अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.

**(ग) पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- उपसचिव संवर्गातील ८ अधिकाऱ्यांना सहसचिव पदी , अवर सचिव संवर्गातील १३ अधिकाऱ्यांना उपसचिव पदी, कक्ष अधिकारी संवर्गातील १८ अधिकाऱ्यांनाअवर सचिव पदी पदोन्नती देण्यात आली आहे.
- अवर सचिव संवर्गातील १ व निवडश्रेणी संवर्गातील १ अशा दोन अधिकारी / कर्मचाऱ्याच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे ३, ४ अशा ७ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आली आहे.
- अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील प्रत्येकी एका अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- १ सहसचिव, २ उपसचिव, १ अवर सचिव व १ अधिकारी अशा ५ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) प्रशिक्षण**

- दिनांक ५ जानेवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखकाचे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा सन २०१८ करिता दिनांक ३१ जानेवारी २०१८ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.
- दिनांक १७ जानेवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१७ चा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

**(छ) सेवाप्रवेश नियम**

- दिनांक ६ जानेवारी २०१८ च्या शासन अधिसूचनेन्वये महाराष्ट्र शासनाच्या विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-ड पदांचे (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१८ प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**(ज) ज्येष्ठतासूची**

- दिनांक २३ जानेवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र ७५९ सहायक कक्ष अधिकाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१७ रोजीची अंतरिम सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**(झ) नियुक्ती**

- राज्यसेवा (मुख्य) परीक्षा २०१५ व २०१६ व्दारे मंत्रालयीन कक्ष अधिकारी पदासाठी शिफारस केलेल्या १७ उमेदवारांची परिविक्षाधीन प्रशिक्षणासाठी परिविक्षा कालावधीवर दिनांक ८ जानेवारी २०१८ पासून खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाकरिता रुजू करुन घेण्यात आले आहे.

***********